कलम ११

# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय जिल्हा अमरावती

क्रमांक-प्र.अ./भू.सं./अ.का./कावि-३४१/२०१८

दिनांक११/०४/२०१८

## अधिसुचना

( भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजदी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

**भूसंपादन प्रकरण क्रमांक- ०१/४७/२०१६-१७ मौजा अमदापूर ता. नांदगाव खंडेश्वर**

ज्याअर्थी, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करता उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना महसुल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ ( यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसुचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड ( झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसुची I मध्ये अधिक तपशीलावर वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **"उक्त जमिन"** असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी ( यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा केला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे. आणि म्हणुन उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भुमीसंपादनच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे या सोबत जोडलेल्या अनुसुचित तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल या अनुसुचिमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल या सोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.(नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसुचिमध्ये तपशित नमुद करावा.)

त्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती हि अधिसुचना प्रसिध्द दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडुन भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भुमीअभिलेखच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी , उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियम खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदुर रेल्वे** यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसुचि-एक

जमिनीचे वर्णन

**गाव :- अमदापूर तालुका:- नांदगाव खंडेश्वर जिल्हा:- अमरावती**

| अ.क्र. | भूसंपादन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र ( हेक्टरमध्ये) | | |
|---|---|---|---|---|
| | | लागवड योग्य क्षेत्र | पोट खराब क्षेत्र | एकुण क्षेत्र |
| १ | १०/१ पैकी | ०.४३ | ० | ०.४३ |
| २ | १२/१ पैकी | ०.७० | ० | ०.७० |
| **एकुण क्षेत्रफळ** | | **१.१३** | **०** | **१.१३** |

## अनुसुची दोन

**सार्वजनीक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** :- निम्न साकळी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- निम्न साकळी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत बुडीत क्षेत्राकरीता

**सामाजाला मिळणारे लाभ** :- -

## अनुसुची तीन

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- विस्थापनाची आवश्यकता नाही सबब माहीती निरंक**

## अनुसुची चार

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सांराश)**

**( सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सांराश**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४अ महसुल व वन विभाग मुंबई दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसुचना अन्वये सुट देण्यात आली आहे.

## अनुसुची पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

( अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- प्रशासकीय नियुक्तीची आवश्यकता नाही.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

(क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशिल. :- निरंक

**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदुर रेल्वे यांच्या कार्यालयात निरिक्षण करता येईल.

**दिनांक :-** ११ /०८/२०१८

**ठिकाण :-**

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी,**
**चांदुर रेल्वे**

11/08/18

**(अभिजीत बांगर)**
**जिल्हाधिकारी, अमरावती**